महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे-४११००४.

---

क्र.रा.मं./पापुई/जु.अ-२०२१/४३८१
दिनांक -१५ ऑक्टोबर,२०२०.

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी–मार्च–२०२१ च्या परीक्षेनंतर जुन्या अभ्यासक्रमाच्या विषयामध्ये सूट न मिळालेल्या/उत्तीर्ण न झालेल्या विदयार्थ्याबाबत.....**

संदर्भ – १.शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४,दि.०८/८/२०२०.
२. परीक्षा समिती,कार्यकारी परिषद, अनुक्रमे ठराव क्र.२५, दिनांक २५सप्टेंबर, २०२०.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१९-२० इ.११वी साठी व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.१२ वी साठी राज्य शैक्षणिक आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विद्या प्राधिकरण), पुणे व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती),पुणे यांच्याकडून करण्यात आलेली आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च-२०२० च्या परीक्षेनंतर जुन्या अभ्यासक्रमाच्या कांही विषयांमध्ये सूट मिळालेली नसेल अशा विद्यार्थ्यांना द्यावयाच्या दोन संधीबाबत विषय परीक्षा समिती विषय क्र. २५ अन्वये व कार्यकारी परिषद विषय क्र.२१ अन्वये दिनांक २५ सप्टेंबर, २०२० च्या सभेत सादर करण्यात आलेला होता.

" उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी/मार्च-२०२० परीक्षेत अथवा त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमामध्ये काही विषयामध्ये सूट मिळालेली नसेल अशा विदयार्थ्यांना पुरवणी परीक्षा सन २०२०-२१ मध्ये पहिली व फेब्रुवारी/मार्च-२०२१ मध्ये दुसरी अशा दोन संधी राहतील.

सदर दोन संधीनंतरही विद्यार्थ्यांस काही विषयामध्ये सूट न मिळाल्यास अथवा तो उत्तीर्ण न झाल्यास इ.१२वीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमांच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१९/प्र.क्र.(२४३/१९) /एसडी-४,दि.०८/८/२०२०.मधील इ.११वी व इ.१२वी विषय योजनेतील योग्य विषयाची निवड करून

विद्यार्थ्यांस विषयामध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. तथापि, प्रात्यक्षिक परीक्षा नसलेला विषय घेवून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेला असेल व त्या विषयामध्ये त्याला सूट मिळाली नसेल, अशा विद्यार्थ्यांस विषय योजनेतील प्रात्यक्षिक असलेल्या विषयाची निवड करता येणार नाही " असा निर्णय झालेला आहे.

तरी उपरोक्त परीक्षा समिती व कार्यकारी परिषदेच्या ठरावप्रमाणे आपल्या कार्यकक्षेतील मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांबाबत कार्यवाही करण्याबाबत आपल्यामार्फत कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ राज्य मंडळास कळविण्यात यावा.

सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
उच्च ामध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे-०४.

क्र.कोविमं/इ.१२वी परीक्षा/531
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १९/१०/२०२०

प्रति,
प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सांगली, सातारा, कोल्हापूर-

इयत्ता १२वी फेब्रु-मार्च २०२० परिक्षेनंतर काही विषयांमध्ये सूट न मिळालेल्या जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना पुढील परिक्षांसाठी दोन संधी देणेसंदर्भात झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नोंद घ्यावी व तसे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

19.10.20

विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४.